


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



● वर्ष : ०२ ● अंक : २०१ ● पुणे ● मंगळवार, दि. ०१ जुलै २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



**पक्षांतरांच्या पाठीमागचे रहस्य** 3



**भाजपाचा सामान्य कार्यकर्ता ते प्रदेशाध्यक्ष : श्री. चव्हाण** 4

## ठळक बातम्या



### उद्धव ठाकरे-राज ठाकरे यांचा एकत्र मेळावा

**मुंबई (आरंभ पर्व) :** सरकारने हिंदी सक्तीचा निर्णय रद्द केल्यानंतर आता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकत्र विजयी मेळावा घेणार आहेत. मोर्चा रद्द झाल्यानंतर आता ५ जुलै रोजी विजयी मेळाव्याच्या माध्यमातून दोघे बंधू एकत्र येणार असून दादरच्या शिवाजी पार्क येथे हा मेळावा होण्याची शक्यता आहे. हिंदी भाषा सक्तीच्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी सरकारने समिती नेमली आहे. शिक्षणाच्या विषयात अर्थतज्ज्ञांची समिती नेमली असली तरी कोणत्याही परिस्थितीत हिंदी सक्ती होऊ देणार नाही असा इशारा ठाकरेबंधूंनी दिला.

### गोपीचंद पडळकर यांच्या विरोधात मोर्चा



**जालना (आरंभ पर्व) :** भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन धर्मगुरुंच्या विरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद सोमवारी जालना शहरात उमटले. सकल ख्रिश्चन समाजाच्या वतीने आमदार पडळकर यांच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. गांधी चौकातून निघालेल्या या मोर्चात ख्रिश्चन समाज बांधव सहभागी झाले होते. मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. ऋतुजा राजगे आत्महत्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी, याप्रकरणी ख्रिश्चन धर्मगुरू तसेच समाजाविरुद्ध वक्तव्ये करणाऱ्या आमदार गोपीचंद पडळकर यांची पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणी या निवेदनाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली.

# पालखी सोहळा करमाळ्यात दाखल

## महिला अधिकाऱ्यांच्या फुगड्या

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**
आषाढी वारीसाठी विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ घेऊन पंढरपूरकडे निघालेल्या अनेक लहान-मोठ्या संतांच्या दिंड्या सोलापूर जिल्ह्यात दाखल होत आहेत. संत निवृत्तीनाथ पालखी सोहळा पंढरपूरच्या अलीकडे करमाळा तालुक्यात काल रविवारी पोहोचला. त्यानंतर सोमवारी सकाळी करमाळा शहरवासीयांना दर्शन देऊन हा पालखी सोहळा सायंकाळी जेऊर मुक्कामी जाऊन विसावला. सुमारे एक लाख वारकरी आणि भाविकांचा सहभाग राहिलेल्या या पालखी सोहळ्याला जत्रेचे रूप आले होते.

रात्री रायगाव येथे मुक्काम करून दुसऱ्या दिवशी सकाळी पालखी सोहळा करमाळा शहराच्या दिशेने मार्गस्थ झाला. एव्हाना, हजारो करमाळेकर संत निवृत्तीनाथांच्या दर्शनासाठी आसुसलेले होते. करमाळा नगरपालिकेचे मुख्याधिकारी सचिन तपासे यांनी शहरात पालखी सोहळ्याचे स्वागत केले. राशीनपेठ तरूण मंडळाने दरवर्षाप्रमाणे यंदाही हजारो वारकऱ्यांसाठी महाप्रसादाची सेवा रुजू केली. त्यावेळी पालखी सोहळा काहीवेळ विसावला होता. त्यानंतर ताजेतवाने होऊन वारकरी संत निवृत्तीनाथांचा रथ ओढत, ज्ञानबा-तुकाराम आणि विठ्ठलाच्या नामाचा गजर करीत, टाळ मृदंगाच्या तालावर भजन तेवढ्याच तालासुरात गात जेऊरच्या दिशेने निघाले. यानिमित्ताने करमाळा परिसरात सेवा आणि भक्तीचा अनोखा संगम पाहायला मिळाला.

आषाढी वारीच्या नियोजनासाठी प्रशासनही गेले काही दिवस अहोरात्र कार्यरत आहे. संतांच्या पालख्या, दिंड्यांचे स्वागत करताना प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्येही ज्येष्ठ-कनिष्ठतेचा भेदभाव पाळला जात नाही. करमाळ्याभध्ये संत निवृत्तीनाथांच्या पालखीचे स्वागत करताना अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह आणि तहसीलदार शिल्पा ठोकडे यांच्यासह इतर महिला मंडल अधिकारी, महिला तलाठी अशा साऱ्याजणी एकमेकांत मिसळून गेल्या होत्या. त्यातूनच तहसीलदार ठोकडे आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांनी उत्साही वातावरणात कपाळी गंध लावून फुगड्यांचा डाव मांडला. ज्ञानोबा-तुकारामांच्या लयबद्ध गजरात या दोघींनी फुगड्या खेळल्यानंतर वारकरी संप्रदायाच्या शिकवणीप्रमाणे खाली वाकून पदस्पर्श केला. या दोघी महिला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महिला तलाठ्यांबरोबरही फुगड्या खेळल्या आणि नंतर एकमेकांना तेवढ्याच आदराने पदस्पर्श केला. यातून एरव्ही, वरिष्ठ अधिकारी म्हणून कर्मचाऱ्यांना फर्मान सोडताना मनात असलेला अधिकारभाव कोठेही दिसला नाही. यानिमित्ताने मिळालेला मनसोक्त आनंद आणि समाधान वेगळेच होते.



# वारजे, बाणेरमध्ये पाणीपुरवठा बंद



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुणे महापालिकेच्या वारजे जलशुद्धीकरण केंद्रातून चांदणी चौक टाकीसाठी पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीच्या गळतीचे दुरुस्तीकाम केले जाणार आहे. या कामासाठी चांदणी चौक झोनमधील वारजे, बाणेर, बालेवाडी परिसराचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे या परिसरात आज, मंगळवारी (१ जुलै) सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

या जलवाहिनीची गळती होत असल्याने महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे वारजे जलशुद्धीकरण केंद्राच्या टाकीतून पाणीपुरवठा होणाऱ्या भागात पाणी येणार नाही. तरी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

### पाणीपुरवठा बंद राहणारा भाग

**चांदणी चौक चौकोनी टाकी, पाषाण साठवण टाकी, भूगाव रोड परिसर, कोकाटे वस्ती, सेंटीन हिल सोसायटी, मधुबन सोसायटी, संपूर्ण बावधन परिसर, उजवी व डावी भुसारी कॉलनी, चिंतामणी सोसायटी, गुरु गणेशनगर, सूरजनगर, सागर कॉलनी, भारतीनगर, बावधन परिसर, सारथी शिल्प सोसायटी, पूजा पार्क, शांतिबन सोसायटी परिसर, शास्त्रीनगर, लक्ष्मीनगर, परमहंसनगर, बाणेर, बालेवाडी, पाषाण, सोमेश्वरवाडी, सुतारवाडी, निम्हणमळा, लमाण तांडा, मोहननगर, सुस रस्ता, धनकुडे वस्ती, पंचवटी, म्हाळुंगे, सुस.**

# संत तुकाराम महाराज पालखी सोहळा आज सोलापूर जिल्ह्यात



**इंदापूर (दै. आरंभ पर्व)**
जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळा इंदापूरमधील सराटी येथे जिल्ह्यातील शेवटच्या मुक्कामी आला. हा सोहळा मंगळवारी सोलापूर जिल्ह्याकडे प्रस्थान ठेवणार आहे. हा वैष्णवांचा मेळा गोकुळीचा ओढा येथे पहिली विश्रांती घेऊन विठ्ठलवाडी, वडापुरी, सुरवड असा टप्पा पार करत दुपारच्या विश्रांतीसाठी बावडा येथे दाखल झाला. भक्तिमय वातावरणात बावडा ग्रामस्थांनी जोरदार स्वागत केले. पावसाळी वातावरण असल्याने बावडेकरांचा आनंद पालखी सोहळ्याचे स्वागत करताना द्विगुणित झाला. ग्रामस्थांनी पालखी खांद्यावर घेऊन बाजारपेठेतून बाजारतळावर उभारण्यात आलेल्या भव्य सभामंडपात आणली. पादुकांची आरती करण्यात आली. बावडा येथे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या रत्नाई निवासस्थानी हजारो वारकऱ्यांना अन्नदान करण्यात आले. या वेळी पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्तांचा पाटील कुटुंब व ग्रामस्थांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

बावडा येथील दुपारचा मुक्काम उरकून पालखीने रात्रीच्या मुक्कामासाठी सराटीकडे प्रस्थान ठेवले. या वेळी बावडा ग्रामस्थांनी गावाच्या वेशीपर्यंत जाऊन पालखीला निरोप दिला. गेल्या महिन्यापासून इंदापूर तालुक्यात पाऊस पडल्याने सर्वत्र हिरवळ पसरली आहे. या वातावरणात मुखी अभंग असा अनुभव घेत सोहळा सराटी मुक्कामी विसावला. पालखी सोहळ्याचा पुणे जिल्ह्यातील हा शेवटचा मुक्काम होता. मंगळवारी सकाळी पादुकांच्या नीरा स्नानानंतर हा सोहळा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करणार आहे.

# विधिमंडळाच्या प्रवेशपत्रावरुन राजमुद्रा हटविली

## संविधानाच्या गळचेपीचा विरोधकांचा आरोप



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनासाठी देण्यात येणाऱ्या प्रवेशपत्रावरुन 'राजमुद्रा' हटविल्यावरुन ही संविधानाची गळचेपी असल्याचा आरोप करीत सोमवारी विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन काळात विधानभवनात प्रवेशासाठी सचिव,सरकारी अधिकारी, प्रसारमाध्यम, अभ्यांगत, पोलीस यांना विधान मंडळ सचिवालयाकडून ओळखपत्र- प्रवेशपत्र दिले जाते. आजवर या प्रवेशपत्रावर असलेली राजमुद्रा यावेळी मात्र अचानक हटविण्यात आली.

सोमवारी ही बाब उघडकीस येताच विरोधकांनी सरकार संविधानाची गळचेपी करीत असल्याचा आरोप केला. विधानभेत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड यांनी औचित्याच्या माध्यमातून ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला. पण अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आव्हाडांना परवानगी नाकारली. राज्य सरकारने आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त प्रसिद्ध केलेल्या सरकारी जाहिरातीमध्येही अशोक स्तंभाऐवजी सेंगोल वापरण्यात आला होता. आता प्रवेशपत्रावरुन राजमुद्रा हटविण्यात आल्याने ही संविधानाची गळचेपी असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला.

जितेंद्र आव्हाड सरकारवर टीका करताना, विधिमंडळाकडून देण्यात येणाऱ्या सर्व प्रवेशपत्रांवर राजमुद्रा असायची. मात्र आता ती जाणूनबजून हटविण्यात आली आहे. राजमुद्रा ही आपल्या देशाची ओळख आहे. ही ओळख पुसण्याचाच प्रयत्न सरकारचा असल्याचा आरोप त्यांनी केला. रोहित पवार यांनीही, ज्या विधिमंडळात कायदे केले जातात त्यात प्रवेशासाठी असलेल्या प्रवेशपत्रावरील राजमुद्रा हटविण्यात आली आहे. आता हळूहळू ही राजमुद्रा सगळीकडून काढली जाईल. संविधानाची गळचेपी भाजपकडून केली जात असल्याची टीका त्यांनी केली. तर या प्रकरणाची विधानसभा अध्यक्षांनी गंभीर दखल घेतली असून चौकशी करण्याची ग्वाही दिल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

**विधी मंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी अमित गोरखे, इद्रिस नायकवडी, कृपाल तुमाने, सुनिल शिंदे आणि डॉ. प्रज्ञा सातव यांची तालिक सभापतीपदी निवड केली. विधान परिषदेच्या कामकाजाची सुरुवात वंदे मातरम् आणि राज्य गीताने झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचा परिचय करून दिल्यानंतर राज्य सरकारचे विविध अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आले. वित्त राज्यमंत्री आशिष जायस्वाल यांनी २०२५ – २६ या वर्षाच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. सभापती प्रा. राम शिंदे यांनी प्रा. राम शिंदे यांनी अमित गोरखे, इद्रिस नायकवडी, कृपाल तुमाने, सुनिल शिंदे आणि डॉ. प्रज्ञा सातव यांची तालिक सभापतीपदी निवड केली. ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, विधान परिषदेचे माजी सदस्य अरुणकाका भिमराव जगताप आणि डॉ. रामदास भगवानजी आंबटकर यांच्या निधनाबाबत सभापती प्रा. राम शिंदे यांनी शोकप्रस्ताव मांडला. शिंदे यांनी डॉ. नारळीकर, अरुणकाका जगताप आणि डॉ. रामदास आंबटकर यांचा जीवन प्रवास आणि कार्यकर्तृत्वाचा आढावाही घेऊन श्रद्धांजली अर्पण केली.**

# सहाय्यक आयुक्त कार्यालयाच्या अनागोंदी विरोधात शिवसेनेचे आंदोलन



**हडपसर (दै. आरंभ पर्व) :** मूलभूत सुविधांचा अभाव, दूषित पाण्याचा पुरवठा, रस्त्यांवरील अतिक्रमणे, कार्यालयातील हजेरी प्रणालीतील अनियमितता आणि अधिकाऱ्यांची अनुपस्थिती, बंद असलेली बायोमेट्रिक यंत्रणा, नागरी समस्या सोडविण्यात होणारी टाळाटाळ आणि एकूणच प्रशासनाच्या बेजबाबदार, बेशिस्त व अकार्यक्षम कारभारामुळे सामान्य नागरिकांना होणारा त्रास, या बाबींकडे लक्ष वेधण्यासाठी शिवसेनेच्या वतीने हडपसर-मुंढवा सहाय्यक आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन करून प्रशासनाचा निषेध करण्यात आला. शहर प्रमुख प्रमोद भानगिरे व जिल्हा प्रमुख उल्हास तुपे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन झाले.

अधिकाऱ्यांना वारंवार अर्ज विनंत्या करूनही मूलभूत समस्या सोडविल्या जात नाहीत. अश्वासने देवून पळवाट काढली जाते. कार्यालयात अधिकारी जागेवर नसल्याने हेलपाटे मारावे लागत आहेत. सहाय्यक आयुक्त कार्यालयाच्या संपूर्ण क्षेत्रात अनागोंदी कारभार सुरू असून एकही काम समाधान देणारे होत नाही.

त्यामुळे परिसरात आरोग्य, वाहतूक व बकालपणासारख्या समस्या मोठ्याप्रमाणात वाढल्या आहेत. या बाबी प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह सामान्य नागरिकांनी सहाय्यक आयुक्त कार्यालयाच्या आवारात आंदोलन केले.

आवारात भाजी, फळे विक्रीच्या हातगाड्या, पथारी व्यवसाय थाटून बाहेर चालते तर, इथेही चालवू द्या, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली होती. प्रशासना विरोधात घोषणा देत, निषेध करीत व कामचुकार अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी करीत हे आंदोलन करण्यात आले. सहाय्यक आयुक्त कार्यालयाच्या आवारात प्रतिकात्मक विक्रेत्यांच्या हातगाड्या लावल्याने परिसराला मंडईचे स्वरूप आले होते. त्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरणही निर्माण झाले होते.

उपजिल्हाप्रमुख अमर घुले, उपशहर प्रमुख विकी माने, दत्ता खवळे, पंकज कोद्रे, शिवा शेवाळे, अभिजीत बोराटे, दीपक कुलाळ, शहर संघटक आकाश रेणुसे, प्रकाश लाकडे, अक्षय तारू, महेंद्र जोशी, बबन आंधळे, शक्ती प्रधान, शैलेश शेलार, योगेश जोशी, योगेश सातव, सिद्धांत भानगिरे, गोरक्षनाथ पांचाळ, सोनू मोरे, रोहित पवार, तुषार मरळ, आरिफ पटेल, प्रशांत डाबी, नरेंद्र आवारे, हरिष माने, उमेश पांढरे, मेहबूब सय्यद, स्मिता साबळे, सारिका पवार, निशिगंधा थोरात, अयोध्या आंधळे, शितल गाडे, राजश्री माने, आशा यादव, गंगा पाताळे, चंचल कीराड, आशा कांबळे, अर्चना सूर्यवंशी, सुनीता भावसार, ज्योती अभंगे आदी यावेळी उपस्थित होते.

**'गेल्या अनेक महिन्यांपासून प्रशासनाच्या अकार्यक्षमतेचा त्रास नागरिक सहन करीत आहेत. वारंवार तक्रारी करूनही ठोस कार्यवाही होत नसल्यामुळे आजचे आंदोलन केले होते. उपायुक्त प्रशांत ठोंबरे यांनी आठ दिवसांत उपाययोजना करण्याचे अश्वासन दिले आहे. येत्या आठ दिवसांत योग्य कार्यवाही न झाल्यास पालिकेच्या मुख्य कार्यालयात आंदोलन करू.'**
**- प्रमोद भानगिरे, शहर प्रमूख, शिवसेना**

**'आंदोलकांनी उपस्थित केलेल्या मागण्या तसेच, अधिकारी व कर्मचाऱ्यांबाबतच्या तक्रारींची तातडीने दखल घेवून कार्यवाही केली जाईल. या भागातील पदाधिकाऱ्यांची आयुक्तांबरोबर बैठक लावून अधिकाधिक प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करू. येत्या आठ दिवसांत त्याबाबत सकारात्मक बदल दिसून येतील.'**
**- प्रशांत ठोंबरे, उपायुक्त, महानगरपालिका**



# मुख्यमंत्र्यांनी हवाच काढली!

पहिलीपासून हिंदी मराठी विद्यार्थ्यांवर थोपणारा आदेश राज्य सरकारने रद्द केल्याची घोषणा केली आणि प्रादेशिक अस्मितेवरून आंदोलन करणाऱ्या शिवसेना उबाठा आणि राज ठाकरे यांच्या मनसे पक्षाच्या आंदोलनातील हवा काढली गेली. हिंदी सक्तीचा करणारा शासन निर्णय रद्द करत असल्याची घोषणा करून मुख्यमंत्र्यांनी एकाच तीरात अनेक पक्ष्यी गारद केले आहेत. कारण मराठीच्या सक्तीच्या मुद्द्यावर शिवसेना उबाठा गट आणि राज ठाकरे यांचा मनसे हे एकत्र येऊ पाहत होते. त्यांनी संयुक्त आंदोलनाची घोषणाही केली होती. त्यामुळे अनेक पत्रकारांना राज आणि उद्धव एकत्र आले तर राज्यात पुन्हा आपले चांगले दिवस येतील आणि त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा आपले हितसंबंध जपता येतील अशी स्वप्ने पडू लागली होती. राज्यात मराठी सक्तीची आहेच आणि महायुती सरकारातील मुख्यमंत्री किंवा दादा भुसे यांनी वारंवार हे सांगितले होते. पण शिवसेना आणि मनसे यांना ही भाजपा सरकारला खिंडीत गाठण्याची संधी वाटली आणि त्यांनी आंदोलन जाहीर केले. पण काल विधिमंडळ अधिवेशनाच्या अगोदर एक दिवस आधी मुख्यमंत्र्यांनी हिदी भाषा सक्तीचे परिपत्रक रद्द केल्याची घोषणा केली आणि उद्धव आणि राज यांच्या आंदोलनातील हवा काढून घेतली. आता त्यांच्या हातात दुसरे काही उरले नाही. आता ठाकरे बंधूंनी आम्ही उद्याचा दिवस विजय दिन म्हणून साजरा करणार आहोत असे सांगितले आहे. पण त्यातील हवा कधीच निघून गेली आहे.

वास्तविक २१ सप्टेंबर २०२१ रोजी ठाकरे सरकारनेच त्रिभाषा सूत्र धोरण स्वीकारले होते. पण आता ते आपल्याच निर्णयाच्या विरोधात आंदोलन करणार होते. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे यांना त्यांच्या निर्णयाच्या फोलपणाची जाणीव करून दिली आहे. आता आपली गेलेली अब्रू वाचवण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र येऊन सभा घेतील अशी घोषणा ठाकरे यांनी केली आहे, पण त्यात काही अर्थ नाही. कारण मुळातच या मुद्द्यातील हवा निघून गेल्यावर किती शिवसैनिक (ठाकरेंचे) येतील याची शंकाच आहे. राज यांच्या मनसेने तर अद्याप यावर काहीही प्रतिक्रिया दिलेली नाही. खरे तर शिवसेना उबाठाची या संपूर्ण प्रकरणात चांगलीच फजिती झाली आहे. 'गिरे तो भी टांग उपर' या न्यायाने त्यांच्याकडून सध्याचा आव आणला



जात आहे. हिंदी भाषेला विरोध करण्याचे काहीच कारण नाही. पण मराठी ही मायभाषा आहे आणि ती सक्तीची आहेच आणि कोणतेही सरकार मराठी भाषेला राज्यातून नेस्तनाबूत करू शकणार नाही. हेच फडणवीस यांनी वारंवार स्पष्ट केले आहे. पण समजून घ्यायचे नाही आणि आपलेच क्षुद्र अस्मितेचे राजकारण करत राहायचे याला सवंगलेले राजकीय पक्ष आपल्याच वळणावर जाणार यात काही शंका नाही, पण फडणवीस यांना ती संधीही मिळू नये याची दक्षता घेतलेली आहे. त्यामुळे राज आणि उद्धव यांच्यापुढे पुढे काय असा प्रश्न आहे. मराठी अस्मितेचे राजकारण करत शिवसेना (अविभाजित) सत्तेवर आली होती आणि राज्यात तिने चांगलेच यशही मिळवले. पण शिवसेना उबाठातील काही स्वार्थांध गटांना मराठी अस्मितेचे राजकारण करण्यातच रस होता. पण त्यांना या निवडणुकीत आणि देशपातळीवरही मतदारांनी चांगलाच धडा शिकवला. पण त्यातून धडा घेतील तर ते शिवसेना (उबाठा) कसले असा प्रश्न होता. अखेर फडणवीसांनी त्यांना त्याची जागा दाखवून दिली आणि आता हे दोघे बंधू किती जरी मराठीच्या अस्मितेचे राजकारणाचा विजय असे म्हणत असले तरीही ते तोंडघशी पडले आहेत हेच सिद्ध झाले. वास्तविक मराठी पहिलीपासून सक्तीची महाराष्ट्रात प्रथमपासून लागू आहे.

मराठी भाषेत शिक्षण दिले असता ते चांगल्या रितीने समजते असा त्यामागे युक्तिवाद केला जातो आणि विद्यार्थ्याला मराठीच नव्हे तर एकापेक्षा अधिक भाषा आल्या पाहिजेत म्हणून हिंदी शिकवले जाते. मुले मोठी झाल्यावर त्यांना हिंदी आणि त्यापेक्षा इंग्रजीत शिकवले नाही, तर ती मागे पडतील हा विचार यामागे होता. कोणत्याही सरकारचा विचार विद्यार्थ्यांचे कल्याण आणि त्याला सर्व भाषांचे शिक्षण मिळून तो जगात रोजगार मिळण्यास सक्षम व्हावा हाच असतो. पण ठाकरे आणि राज यांनी मराठी अस्मिता केंद्रस्थानी ठेवून या मुद्द्याचे राजकारण करण्याचा आणि भाजपाला घेरण्याचा प्रयत्न केला. विधानसभेत चांगलीच आपटी खाल्लेला पवारांचा राष्ट्रवादी गट आणि अन्य काही विरोधी पक्ष यात राजकारण करण्याची संधी आहे म्हणून या विषयावर एकत्र आले. शेवटी मुख्यमंत्री फडणवीस यांनी बाजी मारली आणि नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून त्रिभाषा सूत्र तपासेल आणि त्यांच्या अहवालावर पुढील निर्णय अवलंबून असेल. त्यामुळे महाराष्ट्राची एका अशा पर्वातून सुटका झाली आहे. कारण या मुद्द्याचे राजकारण किती दिवस चालेल हे सांगता येत नव्हते. अर्थातच उद्याचा मोर्चाही रद्द करण्यात आला आहे. दोन्ही ठाकरे बंधू हा आपला विजय असे समजत असतील तर हा त्यांचा भ्रम आहे. कारण मुळात हा मुद्दा नव्हताच. मुद्दा आहे तो विद्यार्थ्यांना वाचता येते की नाही आणि त्यात असर या संस्थेचा अहवाल जे सांगतो ते धक्कादायक आहे. या अहवालानुसार पाचवीतील विद्यार्थ्यांना मराठीतील काही शब्द वाचताही येत नाहीत आणि त्यांना मोठ्याने वाचणे तर दूरच, पण लिहिता येणे अवघड जाते.

त्या बाबतीत ठाकरे बंधूंनी कधीही आंदोलन उभारल्याचे कधी आठवत नाही. केवळ राजकारणासाठी सोयीचे मुद्दे घ्यायचे आणि राजकारण करायचे यामुळे राज्याचा विकास कधीही होणार नाही. दोन दिवसांत या मुद्द्यावर ठाकरे गटाने भरपूर राजकारण करून घेतले. पण त्यांच्या भात्यातील बाण मुख्यमंत्र्यांनी काढून घेतला आहे आणि ते नुसतेच हाती रिकामे धनुष्यबाण घेऊन गर्जना करत आहेत. याला हास्यास्पद विनोदी प्रयोग म्हणतात आणि तो ठाकरे खासकरून उद्धव ठाकरे राज्यात जास्त करत आहेत. त्यामुळे ठाकरे सत्तेवर तर येणारच नाहीत पण मुंबई महापालिका वाचवू शकणार नाहीत.

## हडपसरमधील हरी ओम कॉलनीकडून

# श्री विश्वकर्मा सह भोजलिंग काका दिंडीचे जोरदार स्वागत



**हडपसर (दै. आरंभ पर्व)**

टाळ-मृदंगाच्या तालावर भजनात दंग वारकऱ्यांची पाऊले.... 'ज्ञानोबा माऊली', 'माऊली, माऊली' चा गजर.... डोक्यावर तुळशी वृंदावन, हाती दिंड्या-पताका घेतलेले वारकरी...अशा भक्तिमय वातावरणात पुण्यातील हडपसर मधील हरी ओम कॉलनी मध्ये श्री विश्वकर्मा सह भोजलिंग काका दिंडीचे जोरदार स्वागत करण्यात आले दिंडी चे स्वागत झाल्या नंतर कॉलनीतील बापू जयसिंग गायकवाड यांच्या माऊली या निवासस्थान विसावा घेतल्या नंतर सकाळ चा नाष्टा

बाजीराव चौरे, दिपक गाडेकर, सचिन वाघ यांच्या कडून तर दुपारचे जेवण गोरख उदमले गोड शिरा कावरे साहेब तर रात्रीचे जेवन बापू गायकवाड गोड खीर वाघ साहेब यांच्या वतीने दिंडी मध्ये आलेल्या वारकऱ्यांना देण्यात आले सायंकाळी हरिपाठ घेण्यात आला नंतर हभप गोरक्षनाथ सखाराम सुतार महाराज यांचे कीर्तन झाले दिवस भर हरी ओंम कॉलनीमध्ये भक्तिमय वातावरण झाले होते दुसऱ्या दिवशी सकाळी काकडा आरती झाल्यानंतर दिंडी मधील वारकऱ्यांना एकादशी निमित्त साबुदाणा खिचडी- वाबळे सर, कुंभारकर साहेब आणि मेमाणे साहेब यांच्याकडून तर भगरीचा भात शिवसेना विभागप्रमुख खडकवासला विधानसभा मतदारसंघ शैलेंद्र चव्हाण यांच्याकडून देण्यात आला

तर दिंडी मधील वारकऱ्यांना चहा स्वप्नील लखमदे अशोक भोई,याच्या कडून देण्यात आला तर दिंडी साठी लागणारा भाजीपाला पांडुरंग भिषे यांनी दिला आणि पालखी ने पुढच्या दिशेने प्रस्थान केले विश्वकर्मा सह भोजलिंग काका दिंडीचे मालक गोरक्षनाथ सुतार यांनी दिंडी च्या केल्याला सेवे बदल हरिओम कॉलनीतील सर्व नागरिकांचे आभार मानले गोरक्षनाथ सुतार महाराज गेल्या 16 वर्ष पासून या दिंडी सोहळ्याचे उत्कृष्ट असे नियोजन करत असतात या दिंडी सहभागी वारकऱ्यांची काळजी ते उत्तम प्रकार घेत असतात त्याप्रमाणे भानोबा केटरिंग चे मालक संदीप गायकवाड यांनी सुद्धा आपल्या पद्धतीने वारकऱ्यांची सेवा केली तर बापू गायकवाड यांनी परिसरातील सर्व नागरिकांचे आभार मानले.



# शिशुविहार एरंडवणे माध्यमिक विद्यालयापासून मुक्ताचे सत्र

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशनच्या "शाळा पुस्तकांच्या पलीकडे" या प्रकल्पाला २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात एरंडवणे येथील शिशुविहार माध्यमिक विद्यालयातून झाली. २०१५ पासून सुरू असलेल्या या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना जीवन कौशल्ये तसेच लैंगिक आरोग्याविषयी जागरूक करणे, त्यांना भावनिकदृष्ट्या सक्षम बनवणे आणि संवाद कौशल्य विकसित करणे हा आहे.

इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या या सत्रांचे पहिले सत्र नुकतेच पार पडले. शाळेचे मुख्याध्यापक मा. सतीश केंगर सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सत्राचे मार्गदर्शन मा. दीपाली क्षीरसागर, ऋषिकेश भंडारे आणि मुकेश सावकारे यांनी केले.

या सत्रात सुमारे १९० विद्यार्थी सहभागी झाले. विद्यार्थ्यांकडून अनेक प्रश्न विचारण्यात आले, ज्यात – "स्वतःची ओळख निर्माण कशी करावी?", "नाती सांभाळताना अडचणी येतात, काय करावे?", "मैत्रिणीने संवाद तोडला, त्याने मानसिक त्रास होतो, काय करू?" यांसारखे प्रश्न समोर आले. सत्रातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांच्या शंका शांतपणे दूर केल्या तसेच सर्व विद्यार्थ्यांना मुक्ता मेंटल हेल्थ हेल्पलाईन (७८८७८८९८८२) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले.

या सत्राच्या आयोजनात शाळा प्रशासनाने सक्रिय सहभाग घेतला आणि मोलाची मदत केली.

## थोडक्यात



### कलावंतांच्यावतीने सोन्या पाटील यांना समाज भूषण पुरस्कार प्रदान!

कल्याण (आरंभ पर्व) : महापुरुषांना संगीतमय मानवंदना या कार्यक्रमात सामाजिक कार्याची दखल घेऊन व कोरोना काळात केलेली गरीब गरजू नागरीकांना अन्न, वस्त्र,निवारा,याबाबतची मदत याचा तपशील घेऊन महाराष्ट्रातील कलावंतांच्या वतीने धर्म सेवक डॉ.श्री.सोन्या काशीनाथ पाटील यांना समाज भूषण पुरस्कार महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लोकशाहीर श्री.नंदेश विठ्ठल उमप यांच्या शुभहस्ते व महाराष्ट्राचे लाडके गायक बिग बॉस फेम श्री.संतोष (दादूस) चौधरी यांच्या खास उपस्थितीत गुरुवार दिनांक 26/6/2025 रोजी आचार्य अत्रे रंगमंदिर कल्याण पश्चिम येथे प्रदान करण्यात आला.त्याचबरोबर सदर कार्यक्रमास धर्म सेवक डॉ.श्री.सोन्या काशीनाथ पाटील यांनी 500 वह्या भेट देऊन सामाजिक बांधीलकी जोपासली.म्हणून महाराष्ट्रातील कलावंतांदनी त्यांचे कार्यक्रमाप्रसंगी आभार व्यक्त केले.

### आंघोळीवेळी नीरा नदीत तरुण बेपत्ता; पालखी सोहळ्यात दुर्दैवी घटना

अकलूज (आरंभ पर्व) : जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात अकलूज येथे दुःखद घटना घडली आहे. नीरा नदीत आंघोळ करत असताना आकाश ऊर्फ गोविंद नामदेव फोके (वय २०, रा. झिरपी, ता. अंबड, जि. जालना) हा तरुण पाण्यात बेपत्ता झाला. ही घटना आज (मंगळवार) सकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास घडली. आकाश फोके हा आपल्या आजी प्रयागा प्रभाकर खराबे यांच्यासोबत देहूपासून संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यातील रथामागील बारा क्रमांकाच्या हातगावकर दिंडीमध्ये सहभागी झाला होता. अंबड तालुक्यातील अनेक वारकरी या दिंडीत सहभागी आहेत. सोहळा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करत असताना अकलूजजवळ नीरा नदीच्या घाटावर आंघोळीसाठी थांबले होते. घटनेबाबत प्रत्यक्षदर्शी राहूल अशोक ठोंबरे याने सांगितले की, "मी आंघोळ करून काठावर उभा होतो. तेवढ्यात पाण्यात एक मुलगा बुडत असल्याचे लक्षात आले. मी तात्काळ पाण्यात उडी मारली. त्याच्या हाताला पकडले पण नदीच्या प्रवाहामुळे मीही बुडू लागलो आणि तो माझ्या हातातून सुटून गेला." ही घटना घडली तेव्हा संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा पुणे जिल्ह्यातील नदीच्या पलीकडे सराटी येथे मुक्कामी होता. आकाशचे वडील नामदेव फोके हे शेतकरी आहेत. स्थानिक प्रशासन, पोलिस व बचाव पथकांनी शोधकार्य सुरू केले असून, परिसरात खळबळ उडाली आहे. पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांमध्येही या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

### प्रारूप आराखडा तहसीलदारांकडून प्रशासनाकडे सादर होणार

पुणे (आरंभ पर्व) : जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या प्रभाग रचना (गट, गण) करण्याचे काम जिल्हा प्रशासनाकडून सुरू आहे. लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती आणि आरक्षणाचे निकष लक्षात घेऊन प्रारूप आराखड्याचे काम सुरू केले आहे. प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा १४ जुलै रोजी पूर्ण करून तो तहसीलदारांना जिल्हा प्रशासनाला देणार आहेत. त्याप्रकारच्या सूचना जिल्हा प्रशासनाकडून तालुक्यातील अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या प्रभाग रचना करण्याचे काम राज्य सरकारच्या सूचनेनुसार सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तत्काळ घेण्याचा आदेश देण्यात आला. राज्य सरकारच्या वतीने जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या गट, गण रचना करण्याचा आदेश दिला. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांनी संबंधित भागातील लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती आणि आरक्षणाचे निकष लक्षात घेऊन प्रारूप आराखड्याचे काम सुरू केले आहे. प्रारूप प्रभाग आराखडा जिल्हा प्रशासनाकडे आल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, पंचायत समिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डसह संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर २१ जुलैपर्यंत जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती आणि सूचना सादर करता येणार आहे.






# सचिन विष्णू दांगट यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप, लहान मुलांसाठी बालमहोत्सव खाऊ वाटप, चित्रकला स्पर्धा संपन्न







**वारजे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा मतदारसंघातील शिवणे येथील भाजपाचे युवा नेते श्री. सचिन दांगट यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले . दांगट यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये विविध सामाजिक उपक्रमांनी हा वाढदिवस साजरा करण्यात आला.

त्यामध्ये रिक्षा चालकांना, जेष्ठ नागरिकांना छत्री वाटप, लहान मुलांना खाऊ वाटप, गुणवंत विद्यार्थी सत्कार,शालेय चित्रकला स्पर्धा विविध सामाजिक उपक्रम यानिमित्त घेण्यात आले.

प्रसिद्ध व्याख्याते प्रा. गणेश शिंदे यांचे प्रबोधनपर व्याख्यान झाले. त्यामध्ये त्यांनी उपस्थितांना विविध विषयावर मार्गदर्शन केले.

सचिन दांगट यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमास शिवणे ,उत्तम नगर, कोंढवे धावडे कोपरे परिसरातील नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला.

सचिन दांगट यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी यावेळी मान्यवरांनी व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली.

यावेळी उपस्थितांनी हात उंचावून सचिन दांगट यांना उदंड प्रतिसाद दाखवून दिला..यावेळी बोलताना आ. तापकीर यांनी सचिन दांगट यांच्या कामाची प्रशंसा केली. व आगामी काळात त्यांच्या पाठीशी उभा राहणार असल्याचे सांगितले.

शुक्राचार्य वांजळे यांनी सचिन दांगट यांच्या कार्यास शुभेच्छा देताना उत्तम आरोग्यासाठी व उज्वल भवितव्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

दिलीप बराटे यांनीही मनोगतातून दांगट यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी हभप सौ.ममता दांगट यांनी समाजातील प्रत्येक घटकाला केंद्रबिंदू मानून आम्ही समाजकार्य करत आहोत असे सांगितले.

यावेळी उपस्थित लोकप्रिय आमदार भीमराव अण्णा तापकीर, मा उपमहापौर दिलीप बराटे, मा जि. परिषद उपाध्यक्ष शुक्राभाऊ वांजळे, मा. नगरसेवक प्रदीप बाबा धुमाळ, मा .नगरसेवक किरण बारटक्के, भाजपा नेते अरुण दांगट,अध्यक्ष गणेश वरपे, रूपेश घुले, भारतभूषण बराटे ,राजीव पाटील, किशोर पोकळे, सागर भुमकर ,अनिल मते ,विश्वकर्मा कमिटी शहराध्यक्ष किशोर कदम, माजी सरपंच सुभाष नाणेकर, उमेश सरपाटील, रमेश धावडे, अभिजीत धावडे, भगवान मोरे, गणेश वांजळे, संतोष देशमुख, व मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते.

### जनतेची सेवा हेच माझे ध्येय : सचिन दांगट

**गेल्या चौदा वर्षापासून जनतेच्या विविध प्रश्न घेऊन लढत आहे. त्यास आपल्या सर्वांची सोबत राहिली आहे. आगामी काळात ही जनसेवेचा हा उपक्रम कायमस्वरूपी राबवला जाणार आहे. आपल्या सेवेत कायम असणार आहे. आपली भक्कम साथ अशीच मिळावी असा विश्वास श्री. सचिन दांगट यांनी व्यक्त केला.**

## थोडक्यात




### एटीएममधुन पाचशे काढायला गेले कि मिळत होते अडीच हजार

- **लोणी काळभोर येथील ॲक्सिस बँकेच्या एटीएममधील प्रकार**

**लोणी काळभोर (आरंभ पर्व) : लोणी काळभोर येथील ॲक्सिस बँकेच्या एटीएम मधून आज सायंकाळी पाच वाजल्यापासून पाचशे रुपये काढायला गेले की अडीच हजार रुपये येत असल्याचा प्रकार उघडीस आला . ग्राहकांना ही माहिती मिळाल्यानंतर एटीएम मध्ये पैसे काढण्यासाठी एकच गर्दी झाली. सायंकाळी पाच वाजता एका ग्राहकांने पाचशे रुपये काढण्यासाठी गेला असता त्याने ५०० चा आकडा टाकल्याबरोबर पाचशेच्या पाच नोटा त्याला आल्या. त्यामुळे ही घटना त्या ग्राहकाने आपल्या मित्रांना सांगितले. आणि लोणी काळभोर परिसरात ही घटना वाऱ्यासारखी पसरली .त्यामुळे एटीएम समोर एकच गर्दी झाली घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर पोलिसांनी ॲक्सिस बँकेच्या अधिकाऱ्यांना ही माहिती दिली .त्यानंतर संध्याकाळी सव्वासात वाजता एटीएम बंद करण्यात आले. याबाबत पैसे भरण्याचे कॉन्ट्रॅक्ट सी एम एस या कंपनीला दिले असून त्यांचे ब्रांच मॅनेजर प्रशांत राऊत यांनी तांत्रिक चुकीमुळे ही घटना घडली असून एक लाख १३ हजार रुपये ग्राहकांकडे जास्त गेल्याचे सांगितले. आता पैसे परत देण्यासाठी ग्राहकांना विनंती केल्याचे मॅनेजर यांनी सांगितले. चार वर्षांपूर्वी शेवाळेवाडी येथे दिवाळी सण जवळ असताना असाच प्रकार घडला होता.**

# पक्षांतरांच्या पाठीमागचे रहस्य

**लक्ष्मण साबळे : निवासी संपादक – आरंभ पर्व, पुणे**




**(दै. आरंभ पर्व)**
आजच्या ब्रेकिंग न्यूजच्या युगात एखाद्या आमदाराने पक्ष सोडला, किंवा एखाद्या खासदाराने दुसऱ्या पक्षात प्रवेश केला, की माध्यमांमध्ये अक्षरशः खळबळ माजते. 'या पक्षाला धक्का, त्या पक्षाला हादरा' अशा हेडलाईन्स झळकतात. परंतु खरा विचार केला, तर हा 'धक्का' तितकासा भौगोलिक, राजकीय वा वैचारिक नसतो; कारण जुने जातात, आणि त्यांच्या जागी नवीन चेहरे येतात.

मात्र या पक्षांतरांमध्ये एक गोष्ट सातत्याने दिसून येते – बहुतेकदा विरोधी पक्षातून सत्ताधारी पक्षात होणारी वाटचाल. आणि हेच वास्तव अनेक प्रश्न निर्माण करतं.

**'नाराजी'चा मुखवटा आणि 'सत्ते'च्या दिशेने वाटचाल :** पक्षांतर करणारे नेते हमखास एक जुना क्लिशे वापरतात – "पक्षाने माझ्यावर अन्याय केला", "माझे म्हणणे ऐकले नाही", "स्थानिक प्रश्नांना दुजोरा मिळाला नाही", किंवा "माझ्या कार्यकर्त्यांवर अन्याय झाला"... हे सगळं सांगून ते सत्ताधारी पक्षाच्या वाऱ्या गाठतात.

कधी कधी तर तीन-तीन वेळा आमदार, खासदार झालेले लोकही अशीच नाराजी जाहीर करतात. त्यांच्या चेहऱ्यावरचे दुःख खरे वाटावे इतके अभिनयातलं कौशल्य असतं. मग काही दिवसांत तेच नेते सत्ताधाऱ्यांच्या नेत्यांना भेटतात, आणि एका 'जाहीर कार्यक्रमात' – मोठ्या गर्दीत, फुलांच्या माळांनी – पक्षप्रवेश करतात.

ही आता एक 'राजकीय रीत' झाली आहे.

**राजकारण की स्वार्थकारण? :** कोणताही नेता हे पक्षांतर का करतो, हे समजून घ्यायचं झालं, तर यामागे सर्वात मोठं कारण असतं स्वतःचं राजकीय अस्तित्व आणि पुढच्या निवडणुकीतील संभाव्यता टिकवणं.

सत्ता ही संसाधनांची चावी असते – निधी, प्रकल्प, नियुक्त्या, प्रसारमाध्यमांत स्थान, पोलिस आणि प्रशासनातील बोलबाला... या सगळ्यांत सत्ताधाऱ्यांच्या जवळ राहणं फायदेशीर ठरतं.

अनेक वेळा विरोधी पक्षात राहून मतदारसंघात काम करणं अवघड होतं. खासदार वा आमदार निधीबाहेर इतर योजनांचा लाभ घ्यायचा तर सत्तेची जवळीक हवीच लागते.

त्यामुळे नेते सत्ताधारी पक्षात जाणं ही 'आवश्यक राजकीय कसरत' मानू लागले आहेत.

**खुर्ची नसली, तरी कामं होऊ शकतात :** मात्र सत्तेत नसताना काम करणं अशक्य नाही, हे मंगेश साबळे सारखा युवा सरपंच महाराष्ट्राला दाखवून देतो. जिद्द, संघर्ष आणि लोकाभिमुख दृष्टिकोन असेल तर राजकारणात मोठं परिवर्तन घडवता येतं. सत्तेच्या खुर्चीचा मोह टाळत ही लोकांच्या समस्या सोडवता येतात.

पण आजच्या राजकीय व्यासपीठावर अशी उदाहरणं दुर्मीळ होत चालली आहेत.

**'पक्षनिष्ठा' – आता इतिहासजमा? :** पूर्वी 'पक्षनिष्ठा' ही मूल्यधारित राजकारणाची ओळख होती. पण आता ती एका जुन्या पुस्तकातली संकल्पना वाटू लागली आहे. एकाच कार्यकर्त्याने दोन-तीन पक्ष बदलले, हे सामान्य झालंय. निवडणूक जवळ आली की अनेकजण "योग्य प्लॅटफॉर्म" शोधत फेरविचार करतात.

हे का होतं?

उत्तर सोपं आहे – स्वार्थ, सुरक्षितता, आणि सत्तेची गोडी.

**विरोधी पक्ष – केवळ शोपीस?** : राजकीय वातावरण पाहता राज्य आणि केंद्र पातळीवर विरोधी पक्षात बसण्याची मानसिकता फारच कमी झाली आहे. विरोधी पक्षातील नेते सत्तेपासून दूर असतात, त्यामुळे त्यांना अनेक योजनांचा लाभ घेता येत नाही.

अशा वेळी 'सत्ता' ही केवळ राजकीय नव्हे तर विकासाची गरज वाटते. आणि म्हणूनच विरोधी नेते सत्ताधाऱ्यांच्या वळचणीला जातात.

**सत्तेचं शहाणपण – क्षणभंगुर :** ही सगळी परिस्थिती पाहून एक गोष्ट मात्र नक्की लक्षात ठेवायला हवी – कोणताही नेता अमरपट्टा घेऊन राजकारणात येत नाही.

सत्तेचं शहाणपण फार काळ टिकत नाही.

जनता हीच अंतिम निर्णायक असते.

राजकारण करणाऱ्यांनी स्वतःच्या फायद्याबरोबर जनतेचाही विचार करणं गरजेचं आहे.

राजकीय नेत्यांनी जनतेला गृहीत धरू नये.

कारण तीच जनता योग्य वेळी योग्य निर्णय घेते.

### निष्कर्ष

**कोणत्याही पक्षात जरी जुने नेते जाऊन नवीन चेहरे आले, तरी पक्षांची मूल्यं, विचारसरणी टिकवणं महत्त्वाचं असतं. राजकारण ही सार्वजनिक सेवा आहे, ती केवळ सत्तेचा मार्ग नसून लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांचं रक्षण करणारा स्तंभ आहे. लोकांनीही आता केवळ चेहऱ्यांवर नव्हे, तर विचारांवर मतदान करायला शिकायला हवं. तेव्हाच पक्षांतरांमागचं हे रहस्य उघड होईल – आणि राजकारणाचं खरं स्वरूप जनतेसमोर येईल.**



# सिंहगड रोड परिसरातील अतिक्रमणावर कारवाई






- हातगाड्या – ३
- काउंटर – ७
- शेड/झोपड्या – ८
- इतर साहित्य – १२
- जप्त साहित्याची वाहतूक – अंदाजे ३ ट्रक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील रस्त्यांवर, पदपथांवर तसेच इमारतींच्या फ्रंट आणि साईड मार्जिनमध्ये केलेल्या अनधिकृत कच्च्या-पक्क्या बांधकामांवर महापालिकेने जोरदार संयुक्त कारवाई केली. वाढती वाहतूक कोंडी, नागरी अस्वस्थता आणि वारंवार होत असलेल्या नागरिकांच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली.

ही संयुक्त कारवाई बांधकाम विकास विभाग झोन क्र. ३ आणि अतिक्रमण निर्मूलन विभाग यांच्या वतीने दि. ३० जून २०२५ रोजी पार पडली.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कारवाई :** सदर कारवाई उप आयुक्त (अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग) मा. श्री. संदीप खलाटे, उप आयुक्त परिमंडळ क्र. ३ मा. श्री. विजयकुमार थोरात, तसेच महापालिका सहाय्यक आयुक्त (सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय) मा. श्रीमती प्रज्ञा पोतदार यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

**कारवाईत सहभागी अधिकारी व कर्मचारी :** या कारवाईत क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक श्री. संजय जाधव, अतिक्रमण निरीक्षक श्रीमती मेघा राऊत, कनिष्ठ अभियंता श्री. खाडे व श्री. शिंदे, सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक श्री. प्रशांत कोळेकर, श्री. विनोद दुधे, श्रीमती आकांक्षा खोडे, श्री. अविष्कार दवणे, श्री. योगेश कोत्तावड, श्री. हनमंत काटकर, तसेच २ पोलीस, १० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान व ३० बिगारी कर्मचारी उपस्थित होते.

**कारवाईचा तपशील :** या कारवाईदरम्यान सुमारे २००० चौ. फूट क्षेत्र अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणमुक्त करण्यात आले. यामध्ये खालील वस्तू हटवण्यात आल्या व जप्त करण्यात आल्या.

**कारवाई पुढेही सुरूच राहणार**
महापालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, अशा प्रकारच्या अतिक्रमणविरोधी मोहिमा पुढेही मोठ्या प्रमाणात राबवण्यात येणार आहेत. अनधिकृत बांधकाम व रस्त्यांवरील अडथळे हे नागरिकांच्या सुरक्षेसाठी व वाहतुकीच्या दृष्टीने धोकादायक असल्याने अशा कारवाया अधिक कठोरपणे आणि सातत्याने पार पाडल्या जातील, असा इशारा महापालिकेने दिला आहे.

सिंहगड रोड परिसरातील नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले असून, महापालिकेच्या या पावलामुळे रस्त्यांची मोकळीक, वाहतुकीचा सुगम प्रवाह आणि सुरक्षिततेचा मार्ग मोकळा झाला आहे. ही कारवाई प्रशासनाचे ठोस आणि जबाबदारीचे पाऊल असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे.

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
१.समाजसेवेची आवड
२.जनसंपर्क
३.स्मार्ट फोन असणे आवश्यक
४.सोशल मीडियाचा वापर करता येणे
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

# भाजपाचा सामान्य कार्यकर्ता ते प्रदेशाध्यक्ष : श्री. रवींद्र चव्हाण

- **सामान्य कार्यकर्ता, भारतीय जनता युवा मोर्चा उपाध्यक्षपदा पासून राजकीय कारकिर्दीला सुरवात केलेले रवींद्र चव्हाण यांची जगातील सर्वात मोठ्या व सत्ताधारी पक्षाचे प्रदेश अध्यक्षपदी निवड होत आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा परिचय...**



**• संकलन •**
**श्री. भाऊसाहेब वाकचौरे पाटील**
**जिल्हा संयोजक, भाजपा, सोशल मिडीया सेल, उत्तर नगर जिल्हा**



**(दै. आरंभ पर्व)**

डोंबवली या शहरात कोणतीही राजकीय पाठबळ नसताना सामान्य कार्यकर्ता म्हणून रवींद्र चव्हाण यांची राजकीय कारकीर्द भारतीय जनता युवा मोर्चा मध्ये युवक कार्यकर्ता म्हणून सुरवात झाली. चव्हाण यांना "तळावरील कार्यकर्ता" आणि "स्वच्छ प्रतिमा असलेले राजकारणी" म्हणून व्यापकपणे ओळखले जाते. माध्यमांच्या कव्हरेजमधून त्यांचे मजबूत संघटनात्मक कौशल्य, भाजपच्या सर्वोच्च नेतृत्वाशी तसेच देवेंद्र फडणवीस यांचे सोबत जवळचे संबंध आणि आश्वासने पूर्ण करण्याची त्यांची क्षमता दिसून येते . त्यांच्या नम्रता, सुलभता आणि सार्वजनिक सेवेतील वचनबद्धतेसाठी त्यांचा आदर केला जातो. त्यांना "दादा" म्हणून ओळखलं जात.

**राजकीय कारकीर्द :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत नगरसेवक व स्थायी समितीचे अध्यक्ष झाले. नगरसेवक असताना, चव्हाण २००९ मध्ये डोंबिवली विधानसभा मतदारसंघातून पहिले विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले,२०१४ आणि २०१९, २०२४ मध्ये चव्हाण यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुका जिंकल्या. २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत त्यांनी महाराष्ट्रातील कोकण प्रदेशात सर्वाधिक मते मिळवून विजय मिळवला. २०१६ मध्ये त्यांना महाराष्ट्र सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांच्याकडे बंदरे, माहिती तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण आणि अन्न, नागरी पुरवठा मंत्री तसेच रायगड पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. भारतीय जनता पार्टी चे महाराष्ट्र सरचिटणीस म्हणून नियुक्त करण्यात आले. शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्रालयाची जबाबदारी होती. पालघर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्त केले.

**आमदार म्हणून कार्य :** चव्हाण यांनी कल्याण डोंबवली महानगर पालिका अधिकाऱ्यांसोबत कायदेशीर समस्या सोडवून नोकरीवरून काढून टाकण्याच्या धोक्यात असलेल्या २८५ कामगारांची पुष्टी करण्यास मदत केली. त्यांनी यापूर्वी २००७ मध्ये या कामगारांसाठी पगारवाढीची वकिली केली होती. कल्याण पश्चिम येथे ४०० हून अधिक रहिवाशांसह महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या १.५ किमी गोविंदवाडी बायपास पूर्ण करण्यास झालेल्या विलंबाच्या विरोधात निदर्शने केली. जामीन नाकारल्यानंतर, त्यांना तुरुंगात टाकण्यात आले आणि मुंब्रा-डोंबिवली रस्त्यासह रखडलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर कारवाई करण्याची मागणी करण्यासाठी त्यांनी उपोषण सुरू केले. डोंबिवलीतील पायाभूत सुविधांच्या समस्या सोडवण्यासाठी मुंबईतील मध्य रेल्वे विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात "ताला ठोको" आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यांनी ठाकुर्ली येथे रस्ता ओव्हर ब्रिज, डोंबिवली रेल्वे स्थानकाजवळ चांगल्या पार्किंग सुविधा आणि कल्याण-डोंबिवली समांतर रस्त्याचे काम पूर्ण करण्याच्या मागण्या मांडल्या. चव्हाण यांनी ठाकुर्ली प्रकल्पासाठी आमदार निधीतून २ कोटी रुपये देण्याचे आश्वासन दिले. मध्य रेल्वे व्यवस्थापनाने उपस्थित केलेल्या चिंतांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

डोंबिवलीमध्ये नमो नमो दांडिया कार्यक्रमाचे आयोजन करत दररोज ५०,००० नागरिक सहभागी होतात. रविंद्र चव्हाण यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. गुढीपाडवा शोभायात्रेतील त्यांचा सहभाग असतो. चव्हाणांनी नगरसेवक असल्यापासून देशभक्ती, समाज प्रबोधनाचे विषय मांडण्यास सुरुवात केली होती. २०१० साली त्यांनी "आदर्श डोंबिवलीकर "पुरस्कार देण्यास सुरूवात केली. विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या डोंबिवलीकरांना हा पुरस्कार दिला जातो. मतदारसंघात रोझ फेस्टिव्हल, मुलांसाठी किलबिल महोत्सव, कला क्रीडा महोत्सव, डोंबिवली रेल परिषदेचे आयोजन, डोंबिवलीकर संगीत महोत्सव असे उपक्रम त्यांनी राबवले आहेत. चव्हाण यांनी २०१४ साली डोंबिवलीकरांना फ्री वायफाय सुविधा सुरू केली होती.

**मंत्री म्हणून कार्य :** रवींद्र चव्हाण यांनी गरिबांसाठी 'आनंदाचा शिधा' उपक्रम सुरू केला, सणा सुदीच्या दिवसात आर्थिकदृष्ट्या वंचित कुटुंबांना अनुदानित रेशन पुरवले जात असे . कोकण प्रदेशातील मंदिरांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी काम केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री म्हणून काम करणाऱ्या चव्हाण यांनी प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणाली (पीएमआयएस) सुरू केली, ज्याचे उद्दिष्ट पारदर्शकता सुधारणे आणि प्रकल्प देखरेख सुलभ करणे हे होते.

त्यांनी भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी देखील प्रयत्न केले, विशेषतः 'कॅश-फॉर-ट्रान्सफर' पद्धतींना संबोधित करणे आणि कर्मचारी व्यवस्थापनात जबाबदारी मजबूत करणे. कोकणात पर्यटनाला चालना देण्यासाठी १२ रेल्वे स्थानकांसाठी ५६.२५ कोटी बजेटसह सौंदर्यीकरण आणि पायाभूत सुविधा विकास प्रकल्पावर काम केले .

रवींद्र चव्हाण यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून ९२ हजार कोटी रुपयांची विकास कामे केली, ज्यामध्ये महाराष्ट्रातील रस्ते, पूल आणि इमारतींवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी केंद्र सरकारच्या अक्षय ऊर्जा स्त्रोत योजनेअंतर्गत डोंबिवलीतील २६८ गृहनिर्माण संस्थांना मोफत सौर ऊर्जा युनिट्सचे वितरण देखील केले. चव्हाण यांनी १२ वर्षांपासून रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्ग प्रकल्पातील दीर्घकाळ चाललेल्या विलंबांवर लक्ष केंद्रित केले. त्यांच्या नेतृत्वाखाली, जमीन संपादनाचे प्रश्न सोडवण्यात आले आणि जमीन देणाऱ्या कोकणातील रहिवाशांना भरपाई मिळाली. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री असताना, चव्हाण यांनी ७० बेघर कातकरी कुटुंबांचे पुनर्वसन करून घरे बांधण्यासाठी जमीन उपलब्ध करून दिली.

**कार्याची पावती :** पहिला रेल प्रवाशी मित्र पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांच्या जीवनावर 'जे देखे रवी' हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

११ जानेवारी २०२५ रोजी त्यांना भारतीय जनता पार्टी महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले. देशात नरेंद्र, महाराष्ट्रात देवेंद्र अन पक्षात रवींद्र असे नवे पर्व म्हणून नवीन प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड होत आहे. त्यांच्या भावी कार्यास हार्दिक शुभेच्छा...!

## थोडक्यात



### विजयवाडात आपत्कालीन लँडिंग

**पुणे (आरंभ पर्व) :** पुण्याहून हैदराबादला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात तांत्रिक समस्या निर्माण झाल्याने विमानाचे विजयवाडा विमानतळावर आपत्कालीन लँडिंग झाले. या वेळी विमानात सुमारे १८० प्रवासी होते. संभाव्य धोका टाळण्यासाठी वैमानिकाने आपत्कालीन लँडिंग केल्याचे सांगितले जात आहे. ही घटना रविवारी सकाळी दहाच्या सुमारास घडली. पुणे विमानतळावरून शनिवारी सकाळी ८ वाजून ४३ मिनिटांनी इंडिगोच्या विमानाचे उड्डाण झाले. सकाळी १० वाजता हैदराबादला हे विमान पोहोचणे अपेक्षित होते. मात्र, विजयवाडाच्या हवाई क्षेत्रात आल्यानंतर अचानक विमानात तांत्रिक दोष निर्माण झाला. परिणामी विमानाला हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाकडून विजयवाडा विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार सकाळी पावणेदहाच्या सुमारास विमान सुखरूपपणे उतरले. विमान विजयवाडा येथे उतरल्याने मात्र प्रवाशांची गैरसोय झाली.

### मिळकतकर सवलतीसाठी आणखी वेळ, सात जुलैपर्यंत मुदतवाढ; पुणेकरांना दिलासा

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे महापालिकेचा मिळकतकर भरून त्यावर दहा टक्क्यांपर्यंत सवलत घेण्याची मुदत आज संपत असताना महापालिकेचा सर्व्हर ठप्प झाला. त्यामुळे नागरिकांना कर भरता आला नाही. महापालिका भावनासह अन्य मिळकतकर भरणा केंद्रांवर नागरिकांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे महापालिकेने सवलतीने मिळकत कर भरण्याची मुदत सात जुलैपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती पुणे महापालिकेच्या मिळकत कर विभागाचे उपायुक्त अविनाश सकपाळ यांनी दिली. एक एप्रिलपासून नवीन आर्थिक वर्ष सुरू झाल्यानंतर विकासकामांसाठी पुरेसा निधी महापालिकेच्या तिजोरीत जमा व्हावा, यासाठी गेल्या काही वर्षांपासून सुरुवातीचे दोन महिने मिळकत कर भरणा केल्यास निवासी मिळकतींना पाच टक्के ते दहा टक्के इतकी सवलत दिली जाते, या कालावधीत लाखो पुणेकर बाराशे कोटींपेक्षा जास्त मिळकत कर महापालिकेच्या तिजोरी जमा करतात.

## गुरुवर्य एकनाथ गोविंद देव प्रशालेचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**किरण खुडे**




**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

गुरुवर्य एकनाथ गोविंद देव प्रशालेचा ३७ वा वर्धापनदीन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते. १९८८ पासून ग्रामीण भागातील गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, शेतमजुर, कामगार, दलीत यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण देणारी ही संस्था असून गरीब गुणवंत विद्यार्थ्यांना मुख्य शैक्षणीक प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. असे यावेळी बोलताना सर्वोन्नती मंडळाचे अध्यक्ष विक्रम शिंदे यांनी सांगितले.

कार्यक्रमासाठी रोटरी क्लबचे सचिन घोडेकर, धनंजय राजुरकर प्रशालेचे माजी विद्यार्थी वैभव बेल्हेकर, डॉ. सचिन पटाडे , शेखर सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. मनोगतात संग्राम सोनवणे, गणेश सोनवणे, प्रा.संजय जाधव यांनी त्यांचे प्रशालेतील शालेयजिवनातले किस्से सांगुन संस्थेबाबत ऋण व्यक्त केले. प्रशालेचे मुख्याध्यापक विजय चव्हाण यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले.

याप्रसंगी विशेष गुण प्राप्त झालेल्या व गरजू विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच बक्षीस वितरण करुन सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथींनी हे शैक्षणिक मंदिर अतिशय सुबक देखणे आणि निसर्गरम्य असुन या रमनीय वातावरण असल्याचे मनोगतात सांगितले. व प्रशालेच्या इमारतीची व शैक्षणीक उपक्रमांची तसेच शिक्षक व संस्थाचालक यांचे कौतुक केले. ही शाळा जिल्ह्यातील मॉडेल स्कुल करण्यासाठी मदत करण्याचेही आश्वासन दिले.

याप्रसंगी वैभव बेल्हेकर, डॉ.सचिन पटाडे, शेखर सोनवणे, संग्राम सोनवणे यांनी प्रशालेच्या इमारतींना सीसीटिव्ही कॅमेरे बसवणे, फरशी टाकणे, विद्युतीकरण आणि वृक्षारोपन करण्यासाठी निधी उप्लब्ध करुन दिला.

यावेळी समारंभासाठी सर्वोन्नती मंडळाचे अध्यक्ष व प्रशालेचे माजी विद्यार्थी विक्रम शिंदे, उपाध्यक्ष लक्ष्मण काळे, सचिव नरहरी शिंदे, कार्याध्यक्ष बाजीराव बांगर संचालक सुनील बेल्हेकर, योगेश काळे, भरत चिंचवडे, सुभाष शिंदे आदी मान्यवर व पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## लोणावळा आणि मुळशीत विक्रमी पावसाची नोंद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्ह्यातील घाटमाथ्यावर जोरदार पाऊस सुरु असून गेल्या २४ तासांत ताम्हिणी घाटात २१० मिमी पावसाची नोंद झाली आहे. घाटमाथ्यावर जून महिन्यात २५१५ मिमी इतका पाऊस पडला असून यात लोणावळा, मुळशीमध्ये विक्रमी पाऊस पडला असून चेरापुंजीलाही मागे टाकले आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार चेरापुंजीमध्ये अद्याप १००० मिमीचा टप्पा गाठलेला नाही. यंदा घाटमाथ्यावर मे महिन्यापासून अतिवृष्टी सुरू आहे. जूनमध्येही अवघ्या २६ दिवसांत २५१५ मि.मी. पाऊस झाला आहे. मागच्या वर्षी अल निनो सक्रिय असूनही ताम्हिणीत जून ते सप्टेंबर या मान्सून हंगामात १० हजार मिलिमीटर पाऊस झाला होता, तर महाबळेश्वरमध्ये ७ हजार मि.मी.ची नोंद झाली होती. यंदा हवेचे दाब अनुकूल असल्याने ताम्हिणी आणि महाबळेश्वर ही महाराष्ट्रातील अतिवृष्टीची ठिकाणे मेघालयातील चेरापुंजीमधील अतिवृष्टीचे विक्रम मागे टाकले आहे. देशात सर्वाधिक पाऊस हा मेघालयातील चेरापुंजी आणि मौसेराममध्येच पडतो मात्र, महाराष्ट्रातील घाटमाथ्यावरही तेवढाच पाऊस दरवर्षी जून ते सप्टेंबर या मान्सून हंगामात पडतो.

## भारतीयांच्या बौद्धिक संपदेचे व्यावसायिकीकरण आवश्यक : ॲड. आनंद माहूरकर

**'आयसीएआय'तर्फे एक दिवसीय 'एमएसएमई महोत्सव'**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"बौद्धिक संपदेचा अतिशय समृद्ध वारसा आपल्याला लाभला आहे. या संपदेचा व्यापारवृद्धीसाठी कल्पक आणि फायदेशीर असा वापर आपल्या पूर्वजांनी केला. मात्र मध्ययुगात आपल्याला या वारशाची विस्मृती झाली. आधुनिक काळात या बौद्धिक संपदेचे व्यावसायिकीकरण करणे आवश्यक आहे", असे प्रतिपादन बौद्धिक संपदा कायदातज्ज्ञ ॲड. आनंद माहूरकर यांनी केले. "व्यापारी समृद्धीचा मार्ग बौद्धिक संपदेच्या निर्मिती आणि तिच्या कायदेशीर नोंदणीतून जातो", असेही ते म्हणाले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) कमिटी ऑफ एमएसएमई अँड स्टार्टअप व आयसीएआय पुणे शाखेच्या वतीने आयोजित एक दिवसीय 'एमएसएमई महोत्सवा'त ॲड. माहूरकर बोलत होते. याप्रसंगी आयसीएआय पुणे शाखेचे अध्यक्ष सीए सचिन मिणियार, उपाध्यक्ष सीए प्रणव आपटे, सचिव सीए नीलेश येवलेकर, खजिनदार सीए नेहा फडके, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य प्रीतेश मुनोत, सीए नंदकुमार कदम, सारिका दिंडोकार, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे सहायक संचालक अनिरुद्ध ब्रह्मे, आदी मान्यवर उपस्थित होते. 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, 'कमिटी ऑफ एमएसएमई अँड स्टार्टअप'चे चेअरमन सीए ग्यानचंद्र मिश्रा, व्हाईस चेअरमन अर्पित काबरा यांच्या मार्गदर्शनात हा महोत्सव झाला.




बौद्धिक संपदा हक्क यावर ॲड. माहूरकर यांनी ऐतिहासिक संदर्भ देत केलेले सादरीकरण आणि इतिहासाचा वर्तमानकालीन धागा जोडण्याची समयसूचकता लक्षणीय होती. ॲड. माहूरकर म्हणाले, "बौद्धिक संपदा आणि बौद्धिक संपदा हक्क, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत, हे सुरवातीपासून लक्षात ठेवले पाहिजे. पाषाणयुगातील मानवाने कृत्रिमरीत्या घडवलेली दगडी हत्यारे हे प्राचीन बौद्धिक संपदेचे उत्तम उदाहरण आहे. पुढील काळातही महाराष्ट्रातील कारागिरांच्या घराण्यांनी जपलेली पैठणी वस्त्राची निर्मिती, हेही बौद्धिक संपदेचे आणि हक्कांचे आदर्श उदाहरण आहे. कारागिरांनी पैठणीसाठीचे डिझाईन (उदा. मोर, कोयरी, बुट्टे), रेशनी धागे, वस्त्राला मौल्यवान बनविणारी चांदी व सोन्याच्या तारांची गुंफण, अशी बौद्धिक संपदाही निर्माण केली आणि त्याचे उत्तम पद्धतीने व्यावसायिकीकरणही केले, जे आजही कायम आहे. रेशमी वस्त्रात धातूंचे धागे, हे एकाचवेळी इनोव्हेशन होते, सौंदर्याचा घटक त्यात होता. ते टिकाऊ होते. त्याचा व्यापार सर्वदूर होता.

मध्ययुगीन काळातील आक्रमणे आणि नंतर ब्रिटिश राज्य, यामुळे आपल्याला आपल्याच बौद्धिक संपदेचा विसर पडला. त्याचे जागरण आवश्यक आहे. मात्र, आधुनिक काळाला अनुसरून या संपदेला कायदेशीर नोंदणीचे कोंदण गरजेचे आहे', असे ते म्हणाले.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते स्वराज्य स्पोर्ट्स अँड ट्रेकिंग शॉपचे भव्य उद्घाटन

**क्रीडाप्रेमींसाठी उघडले नवे व्यासपीठ**

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

स्पोर्ट्स आणि ट्रेकिंग क्षेत्रातील सर्व साहित्य एकाच छताखाली आणि माफक दरात उपलब्ध करून देणाऱ्या 'स्वराज्य स्पोर्ट्स अँड ट्रेकिंग शॉप' या नव्या व्यावसायिक उपक्रमाचे भव्य उद्घाटन रविवारी, दिनांक २९ जून रोजी जुन्नर येथे उत्साहात संपन्न झाले. या उद्घाटन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विश्वासराव आरोटे राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व संपादक, दैनिक समर्थ गांवकरी, प.पु. प.म. गोपीराज बाबा बिडकर अध्यक्ष, जुन्नर तालुका महानुभव परिषद, मा. श्री. देवरामशेठ डुकरे सरपंच, पारगांव मंगरुळ तसेच मा. श्री. ज्ञानदेवशेठ डुकरे प्रगतिशील शेतकरी यांच्या शुभहस्ते हा समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आपल्या भाषणात उपस्थितांना भावनिक आणि प्रेरणादायी शब्दांत उद्देशून म्हटले, "आज मला जुन्नर तालुक्यात येण्याचा योग आला आणि ही भूमी नेहमीच मला आध्यात्मिक आणि प्रेरणादायी वाटते. खरं तर असं म्हटलं जातं की प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एका समर्थ स्त्रीचा हात असतो. आजच्या या प्रसंगी आमच्या भगिनी मनिषा भालेकर ताईंनी सुरू केलेल्या 'स्वराज्य स्पोर्ट्स अँड ट्रेकिंग शॉप' या नव्या व्यवसायाचा उद्घाटन सोहळा माझ्या हस्ते संपन्न होणं ही माझ्यासाठी गौरवाची बाब आहे." ते पुढे म्हणाले, शिक्षणाबरोबरच खेळही तितकाच महत्त्वाचा आहे. या शॉपचे व्यवस्थापक म्हणून कार्यभार पाहणारे थोरात सर हे अतिशय कर्तव्यदक्ष, ज्ञानसंपन्न, धैर्यशील आणि नैसर्गिक ट्रेकिंगचा समृद्ध अनुभव असलेले व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या अनुभवाचा लाभ पुणे, नगर, नाशिक अशा तीन जिल्ह्यांतील खेळाडूंना मिळणार आहे. त्यांनी खेळासाठी लागणारे



साहित्य माफक दरात उपलब्ध करून जनसेवा हीच ईश्वरसेवा हे तत्त्व प्रत्यक्षात उतरवले आहे.""स्वराज्य शॉप केवळ व्यवसाय नसून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण आहे," असे सांगून डॉ. आरोटे यांनी शॉपच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. "जिथे जिजाऊ माँ साहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांना शिक्षण, शिस्त आणि शौर्याची शिकवण दिली, त्या पवित्र भूमीत हे शॉप सुरू होत आहे हे अत्यंत गौरवाचे आहे. यामुळे येथील युवकांना खेळाच्या क्षेत्रात अधिक संधी मिळतील आणि ते निश्चितच यशस्वी होतील," असेही त्यांनी नमूद केले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव, दैनिक समर्थ गांवकरीचे व्यवस्थापक संजय फुलसुंदर आणि इतर मान्यवर उपस्थित होते. "लवकरच या शॉपच्या संपूर्ण राज्यात शाखा सुरू होतील," असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. निमंत्रक कु. अनिकेत जनार्दन डुकरे यांच्या संकल्पनेतून उभ्या राहिलेल्या या व्यावसायिक उपक्रमासाठी सह्याद्री वाईल्डलाईफ ट्रेकर्स, स्वराज्य क्रिकेट अकॅडमी, सर्वज्ञ कन्स्ट्रक्शन कंपनी, बळीराजा हायटेक नर्सरी, श्री सिलिंग ॲन्ड इंटेरिअर, श्री मेडीकल पारगाव यांचा मोलाचा सहभाग आहे. उद्घाटन सोहळा यशस्वीपणे पार पडल्याने सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी पुढील यशासाठी स्वराज्य स्पोर्ट्स अँड ट्रेकिंग शॉपच्या टीमला शुभेच्छा दिल्या.

**शॉपमध्ये उपलब्ध साहित्यामध्ये**

**सर्व प्रकारचे स्पोर्ट्स आणि ट्रेकिंग मटेरियल**
**टी-शर्ट व बॅचेस प्रिंटिंग**
**ट्रॉफीज्, ट्रॅकसूट, फोटो फ्रेम्स**
**रेनकोट, बॅग्स आदींचा समावेश आहे.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.